# जाहिर आवाहन

**(ल.पा. प्रकल्पावर महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम 2005 अन्वये उपसा सिंचन पध्दतीने पाणीवापर संस्था स्थापन करणेबाबत.)**

लघु पाटबंधारे प्रकल्प महिरावणी ता. जि. नाशिक प्रकल्प ही योजना सन 1984 मध्ये पुर्ण करण्यात आली आहे. या धरणाचा एकुण पाणी साठा 93.04 द.ल.घ.फु. एवढा असुन उपयुक्तसाठा 89.97 द.ल.घ.फु. इतका आहे. धरणातील पाणी मुख्य विमोचकातुन नदीद्वारे वासाळी गावाजवळील असलेल्या उन्मैयी बंधाऱ्यात येऊन नंतर उजवा कालवा 7.00 किलोमीटर लांब (वहन क्षमता 10.80 क्युसेक्स) व डावा कालवा 4.35 किलोमीटर व (वहनक्षमता 2.84 क्युसेक्स) द्वारे मौजे महिरावणी, वासाळी, तिरडशेत, पिंपळगांवखांब, चुंचाळे व सातपुर या गावांना प्रवाही पध्दतीने पाणी देण्याची तरतूद होती. प्रकल्पाचे एकुण लाभक्षेत्र 576 हे. इतके आहे. या योजनेस पूर्ण होऊन जवळपास 40 वर्षे पूर्ण झाले असून लाभक्षेत्रातील गांवात शहरीकरण झाल्यामुळे कालवे मागील 30 वर्षापासून बंद पडलेले आहे.

सदर कालव्यांची दुरुस्ती महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत सन 2006 मध्ये प्रस्तावित करण्यात आली होती. तथापी लाभक्षेत्रात झालेल्या शहरीकरणामुळे शेतकऱ्यांनी कालव्यांचे दुरुस्ती करण्याची आवश्यकता नसुन सदर दुरुस्तीची कामे करण्यास विरोध दर्शविला होता. त्यानुसार कालवे दुरुस्तीची कामे वगळणेबाबत शासनास कळविण्यात येऊन शासनाने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पामधुन कालवे दुरुस्ती वगळण्यासंदर्भात शासनाचे पत्र क्रं.MWSTI-1006 (592/2006) CAD(work) dated 23/11/2006 अन्वये मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम 2005 व महाराष्ट्र जलसंपत्ती अधिनियम 2005 अन्वये राज्यातील सर्व प्रकल्पांवर पाणीवापर संस्था स्थापन करणे बंधनकारक आहे. तथापी या प्रकल्पाचे कालवे बंद असल्यामुळे व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी कालवे दुरुस्तीस विरोध दर्शविल्यामुळे महिरावणी प्रकल्पावर प्रवाही पध्दतीने पाणीवापर संस्था स्थापन करणेऐवजी उपसा सिंचन पध्दतीने पाणीवापर संस्था स्थापन करुन भिजवणे प्रस्तावित केले असून कालवे बंद झाल्यामुळे कालव्याखालील क्षेत्र हे **अनाधिसुचित (denotify) करणे प्रस्तावित आहे.** तथापी लाभक्षेत्रामधील वरील गांवामधील कालव्याखालील ज्या **शेतकऱ्यांना पाण्याची आवश्यकता** असल्यास त्यांनी दि.10/03/2024 पर्यंत **शाखाधिकारी, ल.पा.नाशिक क्रं.1 नाशिक यांचेकडे अर्ज करावे. तसेच दि.10/03/2024** नंतर आलेल्या अर्जाचा नंतर **विचार करण्यात येणार नाही. लाभक्षेत्रातील उर्वरीत मागणी न आलेले क्षेत्र अनाधिसुचित** करण्याची कार्यवाही जलसंपदा विभागामार्फत करण्यात येईल.

(म. म. सोनवणे)
**उपकार्यकारी अभियंता**
**नाशिक पाटबंधारे विभाग,**
**नाशिक**

**स्थळप्रत मा. का. अभि. यांना मान्य**

**PB-1 Circle-2023**